फाईल क्र. ३७४(२)/विद्युत/२०१९/१४ ब    दिनांक - २३ जून, २०२०

# महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९
# घोषणा
**जाहिरात क्रमांक (१८/२०१९)**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१९ रोजी, घेण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा(मुख्य) परीक्षा-२०१९ चा लेखी परीक्षेचा निकाल **दिनांक २३ जून, २०२०** रोजी जाहीर करण्यात आला आहे. मुख्य परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.

**२. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, मुख्य परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीकरिता प्रवेश देण्यात आला आहे. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.**

**३.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

४. प्रस्तुत परीक्षेत अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची फेर पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविण्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. (आयोगाच्या संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र.३.८ कृपया पहावी.)

**ठिकाण- मुंबई**

**उपसचिव, परीक्षा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**